ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 7 | MARCH - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# " वेदकालीन स्त्रीजीवन "

डॉ. अमिता सोपान जावळे

## प्रस्तावना :




प्राचीन काळापासून भारतीय समाज व्यवस्थेचा मूलभूत आधार असलेली स्त्री सामाजिक जीवनात सक्रिय असूनही संपूर्ण काळात समाजापासून ती दुर्लक्षित राहिलेली दिसून येते. भारतीय समाजात स्त्रियांचा सामाजिक दर्जाबबद्दल कमालीचा विरोधाभास राहिलेला आहे. एका बाजूला स्त्रियांचे धर्माधिष्ठित गौरवीकरण आणि दुसऱ्या बाजूला समाजात प्रत्यक्ष टोकाचे दुय्यम स्थान, तिचे होणारे शोषण हा विरोधाभास आपणास पहावयास मिळतो. स्त्री ही समाजाचा महत्त्वाचा घटक असला तरी समाजातील तिचे स्थान वेळोवेळ बदलत गेले आहे.

ज्या समाजात स्त्रियांचा दर्जा जोपासला जातो त्या समाजाचा विकास जलद गतीने होत असतो. हे सांगत असताना विख्यात समाजशास्त्रज्ञ हर्बर्ट स्पेन्सर म्हणतात की, 'समाजाची प्रगती अथवा अधोगत, विकसितपणा अथवा मागासलेपणा हा मुख्यतः त्या समाजातील स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या वागणूकीवर अर्थात सामाजिक दर्जावर अवलंबून असतो. '[१] एकूणच समाजाच्या विकासातील एक महत्त्वाचा घटक म्हणून स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोन काळानुसार बदलत गेल्याचे आपल्याला दिसून येते. कोणत्याही कालखंडाच्या इतिहासाचा बारकाईने अभ्यास केला असता भारतीय स्त्रीला मिळालेला सामाजिक दर्जा हा पुरूषांच्या तुलनेत दुय्यम व कनिष्ठ प्रतीचाच होता. यासाठीच अनेक तत्त्वज्ञ, विचारवंत व समाजसुधारकांनी स्त्रियांच्या सामाजिक दर्जाच्या अभ्यासाला महत्त्व दिले आहे. प्राचीन काळातील स्त्रियांचा बारकाईने अभ्यास करण्याचा प्रयत्न डॉ. अळतेकर ए. एस. यांनी केलेला आहे. त्यांच्या मते, 'प्राचीन काळात स्त्रियांना पुरूषांबरोबरीचे स्थान होते. कारण तत्कालीन समाज हा सुसंस्कृत स्वरूपाचा पाहावयास मिळतो.'[२]

## ● स्त्री शिक्षण :-

वैदिक काळातील वेदाध्ययनापासून भारतीय शिक्षण पध्दतीचा उदय झाला आणि पुढील काळात बौध्द विद्यापीठांनी तिचा विकास घडविला. उपनयन विधी करून मुलाला ज्याप्रमाणे गुरूगृही पाठवले जाई त्याचप्रमाणे मुलींची ही मुंज (उपनयन) करून त्यांनाही शिक्षणासाठी गुरूगृही पाठविले जाई. या काळात स्त्रिया सुशिक्षित होत्या.[३] त्यांना विद्याभ्यासाचे स्वातंत्र्य असल्यामुळे उपनयन संस्कार झाल्यानंतर अनेक विद्यार्थीनी गुरूकुलांत जाऊन शिक्षण घेत. विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र छात्रीशाला होत्या. अध्ययन करणाऱ्या स्त्री छात्रांचे 'सद्योवधू' व 'ब्रह्मवादिनी' असे दोन प्रकार पहावयास मिळतात. वेदकाळापासून आर्य काळापर्यंत अनेक स्त्री विदुषी भारतात निर्माण झाल्या.[४] लोपामुद्रा ही अगस्तीमुनीची पत्नी होती. तिने ऋग्वेदाच्या ऋचांची निर्मित केली. तसेच घोषा या स्त्रिने दोन अध्ययांचे लेखन केले. गार्गी व याज्ञवक्यची पत्नी मैत्रेयी या ऋषीकन्या उपनिषदाच्या तत्वज्ञानावर चर्चा करीत. महान विदुषी गार्गी तत्कालीन मिथीला नरेश महाराजा जनकाच्या दरबारात नवरत्नामधील एक रत्न होती. तिने वेदांच्या अनेक रचनांबरोबरच 'गार्गी संहिता' नावाचे पुस्तक ही लिहिले आहे. तिने याज्ञवल्क्य ऋषीला निसर्गातील वस्तूंच्या उत्पत्तीचे कारण विचारले होते. यावर जनकाच्या दरबारातील तिचे महत्त्व आपल्या लक्षात येते. शकुंतला, रूक्मिणी उत्तम कवयत्री होत्या.[५] वैदिक काळात स्त्रीला घराची स्वामिनी मानले जात होते. 'जाया इद अस्तम' असे विश्वमित्र याच अर्थाने म्हणतात. मात्र ऋग्वेद काळात मुलींवर होणारा उपनयन संस्कार काळात बंद झाला आणि मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होत गेले.[६] रामायण, महाभारत या कालखंडात तर स्त्रियांची परिस्थिती अजून खालावली. तरी देखील उच्चवर्गीय महिलांना शिक्षण घेण्याची परवानगी होती. रामायणामध्ये कौशल्या आणि तारा यांना 'मंत्रविदु' म्हटले आहे. या युध्दशास्त्रात निपुण होत्या.[७] महाभारतात द्रौपदला पंडिता म्हटले आहे. कारण ती युधिष्ठिर आणि भीष्माबरोबर धर्म आणि नैतिकतेवर चर्चा करत असे.[८] मात्र पुढील

कालखंडात गुप्तकाळापर्यंत क्षत्रिय स्त्रियांना शिक्षणाची सुविधा होती. मात्र नंतरच्या काळात बालविवाह व स्त्रियांवरील जाचक निर्बंधामुळे भारतीय स्त्रिया अशिक्षितच बनत गेल्या. त्यामुळे नंतरच्या काळात सुसंस्कृत स्त्रीचा दर्जा खालावत गेल्याचे दिसून येते.

- **विवाह पध्दती :-**

भारतीय संस्कृतीमध्ये विवाहास मानवी जीवनातील एक अत्यंत महत्त्वाचा संस्कार मानला जातो. वैदिक काळात महिलांना समाजात आदराचे स्थान होते. या काळात मुलीला शिक्षणाचा अधिकार असल्याने तिला आपला जोडीदार निवडण्याचा अधिकार होता.[९] शतपत ब्राह्मणामध्ये पत्नीला पतीचीअर्धांगिणी म्हटले आहे. धार्मिक कार्यात पुरूषाला पत्नीशिवाय यज्ञ करण्याचा अधिकार नव्हता.[१०] या काळात विवाहाच्या एकपत्नीत्व व बहुपत्नीत्व या दोन्ही पध्दती प्रचलित होत्या. उच्चवर्णीयांमध्येच बहुपत्नीत्वाची चाल रूढ होती. वंशाचे सातत्य राखणे हा विवाहाचा दैवी हेतू समजला जाई. ॠग्वेदाच्या दहाव्या मंडलात ८५ व्या सुक्तात आर्यांच्या विवाह पध्दतीचे व दांपत्य जीवनाचे वर्णन आले आहे.[११] आपल्या माता-पित्याच्या संमतीने मुलींनी आपल्या जोडीदाराची निवड केल्याची अनेक उदाहरणे ॠग्वेद काळात आढळतात. या काळात विवाह हा वधूच्या घरी होत असला तरी विवाहानंतर स्त्रीला भारतीय समाज जीवनात पतीगृहीच जावे लागे. आजही त्याच परंपरा आपल्याला पाहावयास मिळतात. अग्नीला साक्षी ठेवून विवाह हात असत.[१२] वैदिक कालखंडाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे मातेला आदराचे व प्रतिष्ठेचे स्थान होते. बाल विवाह, स्त्रीभ्रूण हत्या तसेच सती प्रथा ही अस्तित्त्वात नव्हती. या काळात विधवा विवाहाला मान्यता नसली तरी स्त्री निपुत्रिक असल्यास धर्माप्रमाणे मृत्यू संस्कारासाठी पुत्र हवा म्हणून तिला पुर्नविवाहाची (नियोग) परवानगी होती. वैदिक काळात स्वयंवर व इतर आठ विवाहाचे प्रकार अस्तित्वात होते. पुढील काळात वर्णसंकर व जातीसंकर सुरू झाल्याने आंतरजातीय प्रकार अस्तित्वात आला. या काळात आंतरजातीय विवाह होत असले तरी उच्च वर्णाचा शुद्र वर्णाशी विवाह मान्य नव्हता.[१३] चारही वेदांमध्ये महिलांबद्दल अनेक मंत्र आहेत, ॠग्वेदामध्ये स्त्रिविषयक ४२२ मंत्र असून यजूर्वेदानुसार वैदिक काळात मुलींचा उपनयन संस्कार होत. ॠग्वेदानुसार विधवा आपल्या मृत पतीची चिता सजवत असल्याची माहिती मिळते.[१४] असे असले तर ही वेदकाळात स्त्री-पुरूषांचा दर्जा समान होता हे विधान तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना मान्य नाही. कारण वेदकाळात पुरूषांनी अनेक बायकांशी लगन करण्याचा प्रघात होता. याबाबत वेदामध्ये अनेक ठिकाणी समर्थनही केल्याचे आढळते. ऐतरेय ब्राह्मणात हरिशचंद्राला शंभर बायका होत्या असे म्हटले आहे. मात्र स्त्रीला एकच पती असला पाहिजे असे स्पष्ट विधान वेदामध्ये दिसते. तसेच स्त्रीला वारसा हक्क नसल्याचेही वेदात स्पष्ट केले आहे.[१५]

उत्तर वैदिक काळात स्त्रियांवर अनेक बंधने लादण्यात आली. शिक्षण, विवाह, मालमत्ता, वारसा, धर्मविधी इत्यादींचे स्वातंत्र्य हळूहळू कमी होऊ लागले. घरकाम व पुत्रोत्पत्तीपुरतेच स्त्रीचे महत्त्व सिमीत राहिले. गोभील गृहसुत्रात पत्नीलाच घर मानले आहे. आश्वलायन गृहसुत्र तसेच इतर धर्मसुत्रांमध्ये विवाहाचे आठ प्रकार सांगितले आहेत. ब्राह्म विवाह, दैव विवाह, आर्ष विवाह, प्रजापत्य विवाह, असुर विवाह, गांधर्व विवाह, राक्ष्ज्ञस विवाह, पिशाश्च विवाह इत्यादी. सतीची पध्दती अस्तित्वात नव्हती, त्यामुळे वशिष्ठ धर्मसुत्रानुसार काही प्रसंगी स्त्रीला पुर्नविवाहाची मान्यता देण्यात आली आहे.

' पिता रक्षति कौमारे भरता रक्षति यौवने ।
रक्षन्ति स्थाविरे पुत्रा : न स्त्री स्वातंन्त्र्य महीति ।।

यावरून स्त्रिच्या रक्षणाची एकूणच जबाबदारी पुरूषांवर होती हे स्पष्ट होते. कोणत्याही परिस्थितीत पत्नीला त्यागन्याची परवानगी देत नाही. या अपराधासाठी आपस्तंभामध्ये पतीला कठोर शिक्षा सांगितली आहे. यावरून पत्नीशी घटस्फोट घेणे या काळात मान्य नव्हते असे दिसून येते. याशिवाय तरूण मुलीला 'स्वयमेव' विवाहाचीही परवानगी दिलेली आहे.[१६] उत्तर वैदिक काळात स्त्रिया धामिक व सामाजिक समारंभात पूर्वीप्रमाणेच भाग घेत असल्या तरी त्यांचा दर्जा फारच कमी झोला होता. विवाह विषयक नियम कडक होत गेल्याने जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य स्त्रीला उरले नव्हते. या काळात स्त्रीला उपभोगाची एक वस्तू माननण्यात येऊ लागले. ऐतरिय ब्राह्मणामध्ये मुलीचा जन्म चिंतेचे कारण असल्याचा स्पष्ट उल्लेख आढळतो. अथर्ववेदात मुलीच्या जन्माची निंदा केली आहे. मैत्रायणी संहितेमध्ये तर स्त्रीला द्युत आणि मदिराच्या श्रेणीमध्ये नेऊन ठेवले होते. याच संहितेमध्ये मनुच्या दहा पत्नींचा उल्लेख आढळतो. यावरून उत्तर वैदिक काळात बहुपत्नीत्वाची पध्दतरूढ होती हे दिसून येते.[१७] या काळात बहुपत्नीत्वाची चाल मोठ्या प्रमाणावर प्रचलित असल्याने वरिष्ठ वर्गातील विवाहित स्त्रियांना सवतीचे अस्तित्व मान्य करणे भाग पडले. ॠग्वेदात वारांगणेचीही काही उदाहरणे आढळतात. महाकाव्याच्या काळात शकांच्या आक्रमणाने भारतीय समाजात सती प्रथेची व पडदा पध्दतीचही काही उदाहरणे मिळतात. महाभारतात वेश्यांचाही उल्लेख मिळतो. एका स्त्रीने अनेक

पती करण्याची विचित्र पध्दत महाभारतात आढळते. पण हे सर्व पती एकाच कुटुंबातील असावेत असा नियम होता. मात्र पुढील काळात ही चाल हिंदुस्थानात रूढ होऊ शकली नाही.

थोडक्यात प्राचीन विवाह पध्दती पवित्र धार्मिक विधी म्हणून सुरूवात झाली. तरीही निषिध्द स्त्री विघातक विवाह प्रकारचीच संख्या वाढत गेली. कालौघात त्यापैकी काहींना धर्म व समाज मान्यताही मिळत गेली. यावरून प्राचीन विवाह पध्दती स्त्रियांना उच्च-कनिष्ठतेचा संमिश्र दर्जा प्राप्त करून देणारी होती, असा निष्कर्ष काढता येतो.

- **स्त्रियांची धार्मिक स्थिती व सामाजिक स्थिती :-**

प्राचीन काळात स्त्रियांचा सामाजिक व धार्मिक दर्जा ठरविणाऱ्या विविध पैलूंचा विचार केल्यावर असे लक्षात येते. वैदिक काळ आणि त्यानंतरच काही काळ स्त्री जीवनाच्या प्रगतीच्या दृष्टीने सुवर्णाक्षरांनी लिहिण्या योग्य होता असे तत्कालीन ग्रंथावरून दिसून येते. वैदिक काळात स्त्रियांना धार्मिक अधिकार पुरूषांच्या बरोबरीने असले तरी त्यांना राजनैतिक आणि सांपत्तिक अधिकार नव्हत. यज्ञयागात स्त्रीचा सहभाग वास्तविक स्वरूपाचा होता. पतीप्रमाणे तिलाही धार्मिक हक्क मिळालेले होते.[१८] होमहवन आदि कृत्ये पती व पत्नी या दोघांनी मिळून करावीत असा स्पष्ट नियम ऋग्वेद काळात पहावयास मिळतात. मेजवान्या, नृत्य इत्यादी प्रसंगी स्त्रिया समाजात काही आडपडदा न ठेवता वावरत.[१९] धर्माचा स्त्री जीवनाशी घनिष्ठ संबंध होता. यज्ञपसंगी स्त्रीला आपल्या पतीच्या बरोबरीचे स्थान मिळत असे आणि यज्ञात हविर्भाव अधिकार ही तिला मिळालेला होता. सर्वार्थाने पत्नी आपल्या घराची गृहस्वामिनी होती. वैदिक काळात उत्सव प्रसंगी पुरूष आणि स्त्रिया मिळून नृत्य करीत असत.[२०]

वेदकालीन समाजात कुटुंबामध्ये सर्वंकष अधिकार हा पुरूषांचा असे. विधि घटकातील अंतिम निर्णय हे पुरूषच घेत. कुटुंबातील वंशावळ ही पुरूषांच्याच नावाने चाले. यावरून वैदकाळातही पितृसत्ताक पध्दती अस्तित्वात होती हे लक्षात येते. दत्तक प्रसंगी मुलगाच दत्तक घेतला जात असे.[२१] अर्थात आजही अनेक ठिकाणी अशीच प्रथा रूढ आहे.

ऋग्वेद काळात स्त्रीला अनेक बाबतीत स्वातंत्र्य होते, मात्र उत्तर वैदिक कालखंडात व रामायण महाभारत कालखंडात तिच्या स्वातंत्र्यावर अनेक बंधने आली, असे असूनही धार्मिक विधीमध्ये मात्र स्त्रियांचा सहभाग कायम राहिला. मात्र राजकारणात आणि समाजात तिला दुय्यम स्थान मिळत गेले. या काळात राज्यातील सभेच्या बैठकीला जाण्याचा हक्क तिला उरला नाही. तसेच तिचा वारसा हक्काही काढून घेण्यात आला.[२२] या काळात पुरूषी अहंकाराला खतपाणी घालून स्त्रियांना दुय्यम ठरविण्याचे काम काही धर्मशास्त्रज्ञांनी केले. सुरूवातीला ज्या धर्माने स्त्रीला स्वातंत्र्य व दर्जा दिला त्याच धर्म नियमांनी नंतरच्या काळात स्त्रियांना बंदिस्त करून टाकले. धर्मनियम उच्च मूल्यांची जोपासना करणारे असले तरीही हीन वृत्तीच्या पुरूषाी समाजाने त्याचा वापर करून स्त्री आजही समाजात दुय्यम स्थान दिलेले दिसून येते.

- **वारसा हक्क व स्त्रीधन :-**

वैदिक काळात पती-पत्नी आपलया घराचे व घरातील वस्तूंचे संयुक्त मालक समजले जात. मात्र प्रत्यक्षात स्त्रीला मालमत्तेत समान वाटा व दर्जा मिळाला नाही. तिला संपत्तीच्या बाबतीत जे काही हक्क होते ते गौण प्रकारचे होते. या काळात स्त्रियांचे सामाजिक व धार्मिकअधिकार समान असले तरी ही ऋग्वेदकालीन समाज स्त्रियांना राजनितीमध्ये भाग घेणे, संपत्तीसंबंधीच्या अधिकारासाठी अयोग्य समजले.[२३] या काळात कुटुंबाची संपत्ती, विभाजन, वारसा, स्त्रीधन व स्त्री-पुरूषांच्या अधिकाराविषयीचे नियम होते. या सर्वांना शासनाच्या कायद्याचा दर्जा होता. कौटुंबिक स्थावर, जंगम मालमत्तेचा अधिकार कुटुंबातील सर्व सदस्यांना असला तरी ही पत्नी, कन्या व विधवांचा हक्क हा मामूली स्वरूपाचा होता. पुत्र नसेल तर ते दांपत्य एखादा दत्तक पुत्र घेऊन त्याला वारस बनवत.[२४] उत्तर वैदिक काळात तर स्त्रियांचा वारसा हक्क पूर्णपणे काढून घेण्यात आला. वंशपरंपरागत मालमत्तेवरही तिला कोणताही हक्क उरला नव्हता.[२५] राजनैतिक तसे मालमत्तचे सर्व आधार या काळात स्त्रीकडून काढून घेण्यात आले, असे असले तरी पतीच्या गैरहजेरीत पत्नीला नेहमीचा खर्च करण्याचा अधिकार होता. मात्र स्थावर मालमत्ता ही ग्रामपंचायतीची किंवा मोठ्या अविभक्त कुटुंबाची समजली जाई. पतीच्या मृत्यूनंतर पतीच्या मालमत्तेवर विधवेचा अधिकार आपस्तंभाने नाकारला आहे. नंतरच्या काळात विष्णू व याज्ञवल्क्य धर्मशास्त्रकारांनी पुत्राच्या अभावी पतीच्या सर्व मालमत्तेवर पत्नीचाच संपूर्ण मालकी हक्क असावा असे म्हटले आहे. विधवेचा वारसा हक्क मान्य न करणाऱ्या मनुने मातेचा वारसा हक्क मान्य केला आहे.[२६] तरीही स्त्रीच्या वारसा हक्काविषयी परस्पर विरोधी मते असल्याचे आपणास दिसून येते. असे असले तरी ही विवाह प्रसंगी दिलेले स्त्रिचे तिचे स्वतःचे दाग-दागिने, वस्त्रे, जड व जवाहिर यावर तिचा हक्क होता. स्त्रिच्या अधिकारातील या मालमत्तेला 'स्त्रीधन' म्हटले जाते.

अशा प्रकारच्या स्त्रीधनाचा (आंदण) पहिला उल्लेख ऋग्वेदातील विवाह सुक्तात ऋ. १०-५८, १३, ३८ मध्ये आला आहे. वैदिक कालखंडात आजच्या सारखी हुंडा पध्दती नव्हती. मात्र गोधनाच्या स्वरूपात सहाय्य दिले जात असे. वेदकाळात हुंडा

पध्दती प्रचलित नसल्याने आंदणावर भर दिलेला होता. याज्ञवल्क्याने अशा स्त्रीधनाचे नऊ प्रकार सांगितले आहेत. या स्त्रीधनात सुरूवातीला वडिलांकडून मिळालेल्या संपत्तीचा समावेश असला तरीही नंतरच्या काळात माता, पिता, बंधु, नातेवाईकांकडून व पतीकडून मिळालेल्या धनाचाही त्यात आंतर्भाव होत गेला. स्त्रीला संपत्ती कोणत्या मार्गाने प्राप्त झाली किंवा ती स्त्री विवाहित, अविवाहित किंवा विधवा आहे. यावर तिच्या स्त्रीधनाचा अधिकार अवलंबून असे. अविवाहित कन्येला व विधवेला स्त्रीधनाचा अधिकार होता. मात्र पतीच्य स्थावर मालमत्तेवर तिचा अधिकार नव्हता.[२७]

मुलीच्या मृत्युनंतर तिचे स्त्रीधन संततीकडे येत असे. मात्र ती विना अपत्य मरण पावली तर तिचे सर्व स्त्रीधन माहेरी वडिलांना मिळत. मनुस्मृती स्त्रीधनाचे सहा प्रकार सांगते. विष्णु पुराणाने स्त्रीधनात तीन गोष्टींचा समावेश केला आहे. वधुच्या विवाहासमयी काही देणग्या मिळत, या देणग्यांना 'परिणहय' म्हटले जात. त्यात मुख्यत्त्वेकरून भांडीकुंडी, अलंकार व वस्त्रे असत. यावर संपूर्ण मालकी स्त्रीची असे. विधवेचा वारसा हक्क मान्य न करणाऱ्या मनुने मातेचा वारसा हक्क मान्य केलेला आहे.[२८] स्त्रीधनावर वारसाच्या क्रमात भिन्नता असली तरी ही कन्या, कन्यापुत्र, पुत्र, पती, संगोत्र माता-पिता व यापैकी कोणीही हयात नसेल तर स्त्रीधनाचा वारसा राजाला मिळत असे.

## ● निष्कर्ष :-

एकूणच वेदकाळात स्त्रियांची स्थिती चांगली असून समाजातील तिचे स्थान पुरूषांच्या बरोबरीचेच होते. त्यांना स्वगृही मान दिला जात असे. मुलांप्रमाणे मुलींचीही मुंज होत. त्यांना शिक्षणाचा अधिकार बरोबरीचा होता. त्यामुळेच तत्कालीन काळात स्त्रिया 'सद्योवधू' व ब्रह्मवादिनी होऊ शकल्या. वेदाकालीन स्त्री जीवनाचा अभ्यास करीत असताना असे लक्षात येते की, आधुनिक काळात ज्याप्रमाणे स्त्रीवर अत्याचार होत आहेत. तसे अत्याचार वेदकाळात झाल्याचा उल्लेख मिळत नाही. वेदकाळात स्त्रियांना स्वतंत्र अधिकार दिलेले होते. कुटुंब व्यवस्थेत स्त्रीला मिळणारा मानसन्मान, कुटुंबाच्या मालमत्तेत स्त्रीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने केलेला विचार स्त्रीधनाची संकल्पना, नियोग पध्दती, जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य अशा गोष्टींमध्ये स्त्रिचा सामाजिक दर्जा जपलेलाच दिसून येतो. तसेच काही ठिकाणी तिचा विरोधी दर्जा व तिची भिन्न रूपे दृष्टीसे पडतात. तसेच स्त्रिच्या व्यक्तीमत्त्वाचे अनेक पैलूही समोर येतात. वैदिक कालखंडात स्त्रियांची स्थिती समाधानकारक होती. मात्र बौध्द काळ, मौर्योत्तर काळ व गुप्तोत्तर काळात तिला दुय्यम स्थान प्राप्त झाले. राजकीय अस्थिरतेुळे व परकिय आक्रमणामुळे तिच्यावर अनेक निर्बंध लादण्यात आले. या निर्बधांना धर्मशास्त्रांनीही हातभार लावला. तरी देखील वेदकालीन भारतीयांनी उच्च स्त्री जीवनाचा आदर्श जगासमोर ठेवला आहे, असेच म्हणावे लागेल.

## संदर्भ व तळटिपा


१) हर्डेकर मंजप्पा, बसर्व दर्शन (मराठी) लेखसंग्रह, पृ. ८१.

२) ओतुरकर राजाराम, भारतीय स्त्री, लेख, ऐतिहासिक काळातील स्त्री, पृ. ६४.

३) गायधनी रं. ना., राहुरकर व. ग., प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९५५, पृ. ३९.

४) जोशी पी. जी., प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, २००३, पृ. २२९.

- **सद्योवधू :- विवाह होईपर्यंत शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना सद्योवधू असे म्हटले जात.**
- **ब्रह्मवादिनी :- शिक्षण पूर्ण होईपर्यंत अविवाहित राहणाऱ्या किंवा आयुष्यभर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थीनींना ब्रह्मवादिनी असे म्हटले जात.**

५) श्रीवास्तव के. सी., प्राचीन भारत का इतिहास तथा संस्कृति, इलाहाबाद, १९९१, पृ. ३४ - ३५.

६) दिक्षित नी. सी., प्राचीन भारताचा इतिहास, पृ. ३८ - ३९.

७) श्रीवास्तव के. सी., उपरोक्त पृ. ९२.

८) कित्ता, पृ. ९२ - ९३.

- जोशी पी. जी. उपरोक्त पृ. २२९.

९) देशमुख मा. म. प्राचीन भारताचा इतिहास, पृ. ४५.

१०) श्रीवास्तव के. सी., उपरोक्त पृ. ६९.

- **जायेदस्त्म् :- पत्नी म्हणजे कुटुंब, पत्नी म्हणजेच घर या अर्थाने जायेदस्तम् हा शब्द वापरला आहे.**

११) गायधनी, राहुरकर, उपरोक्त पृ. ३८.

१२) कोलारकर श. गो., भारताचा इतिहास प्राचीन व मध्ययुगीन, पृ. ३४.

१३) दिक्षित नी. सी., प्राचीन भारताचा इतिहास, पृ. ३८ - ३९.

- **नियोग :- एखाद्या पत्नीची अथवा विधवेची नियोजित पुरूषाबरोबर संभोग करून पुत्राच्या उत्पादनासाठी केलेली नियुक्ती म्हणजे 'नियोग' पध्दती होय.**

१४) शर्मा रामशरण, प्राचीन भारताचा इतिहास, पृ. १२३.
१५) देशमुख मा. म., उपरोक्त पृ. ५९.
१६) श्रीवास्तव के. सी., उपरोक्त पृ. ८७ - ८८.

- **स्वयमेव :- मुलगी वयात आल्यानंतर जर तिच्या पित्याने तिचा तिन महिन्याच्या आत तिचा विवाह नाही लावून दिला तर तिन महिन्याच्या प्रतिक्षेनंतर तिला तिचा विवाह स्वतः करवून घेण्याचा अधिकार होता.**

१७) श्रीवास्तव के. सी., उपरोक्त पृ. ८२.
१८) दिक्षित नी. सी., उपरोक्त पृ. ३८ - ३९.
१९) गायधनी, राहुरकर, उपरोक्त पृ. ३७ - ३८.
२०) कोलारकर श. गो., उपरोक्त पृ. ३४ - ३५.
२१) घुगरे सुर्यकांत, वीरशैव व इतर धर्म आणि समाज, कोल्हापूर, २०००, पृ. १६२.
२२) कोलारकर श. गो., उपरोक्त पृ. ४५.
२३) श्रीवास्तव के. सी., उपरोक्त पृ. ८७.
२४) जोशी पी. जी., उपरोक्त पृ. २३२.
२५) कोलारकर श. गो., उपरोक्त पृ. ४३.
२६) पाटील पद्मजा, जाधव शोभना, भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००७, पृ. १३६ - १३७.
२७) जोशी पी. जी., उपरोक्त पृ. २३३.
२८) पाटील पद्मजा, जाधव शोभना, उपरोक्त पृ. १३५.